आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१० जून २०२४ - सोमवार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कार्यभार स्वीकारला. हा पदभार तिसऱ्यांदा स्वीकारल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १७ वा हप्ता जारी केला. या २० हजार कोटी रुपयांच्या निधीचा फायदा ९ कोटी ३० लाख शेतकऱ्यांना होणार आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी हे नवं सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली.

नवनियुक्त मंत्रिमंडळाची पहिली बैठक आज संध्याकाळी होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह रालोआ मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा काल राष्ट्रपती भवनात झाला. महाराष्ट्रातल्या ६ जणांचा त्यात समावेश असून नितीन गडकरी, आणि पीयूष गोयल, यांनी कॅबिनेट मंत्री म्हणून तर रामदास आठवले, प्रतापराव जाधव, रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांनी राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा राज्यात अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी एकत्र जमून मोठ्या पडद्यावर पाहिला, आणि नंतर जल्लोष साजरा केला. ठिकठिकाणी मिठाई वाटून तसंच फटाके वाजवून कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.

**रत्नागिरी**,**कोल्हापूर,** नाशिक,नंदुरबार इथं कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केल्याच्या बातम्या आमच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या चार जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारांच्या अर्जांची छाननी आज होत आहे. मुंबई पदवीधर, मुंबई शिक्षक, कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक मतदारसंघात मिळून ११० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. कॉंग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजपा,  राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदच्चंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि समाजवादी गणराज्य पक्षाच्या उमेदवरांनी या निवडणुकीसाठी अर्ज दाखल केले आहेत. अर्जांची छाननी आज झाल्यानंतर १२ जून रोजी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. तर २६ जून रोजी या चारही जागांसाठी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातल्या मरीन ड्राइव्ह ते हाजी अली या सव्वा किलोमीटर लांबीच्या बोगद्याची पाहणी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. त्यानंतर हा मार्ग वाहतुकीसाठी खुला झाला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा २५ वा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. त्यानिमित्त मुंबईत पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री हसन मुश्रीफ, अनिल पाटील, रुपाली चाकणकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे संस्थापक आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत अहमदनगर इथं राष्ट्रवादी कॉंग्रेसचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने आज प्रथमच ७७ हजाराचा टप्पा ओलांडला. कालच्या तुलनेत ३८६ अंकाची उसळी घेत सेन्सेक्स ने ७७ हजारा चा विक्रमी उच्चांक गाठला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ही १२२ अंकांनी वाढून २३ हजार ४१२ अंकावर पोहोचला.

<><><><><>

नैर्ऋत्य मोसमी पावसाने काल राज्याच्या अनेक भागात प्रवेश केला असून, मुंबईत साधारणतः ११ जूनला अपेक्षित असणारा मान्सून, दोन दिवस आधीच दाखल झाला असल्याचं हवामान खात्याने सांगितलं आहे. काल रात्री पावसाच्या सुखद सरींनी मुंबईकरांना उकाड्यापासून दिलासा दिला. शहराच्या सखल भागात मात्र काही ठिकाणी पाणी साचलं होतं. **नाशिक** जिल्ह्याच्या अनेक भागात पावसामुळे झालेल्या दुर्घटनांमधे दोघांचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले आहेत. देवळा तालुक्यात वीज कोसळल्याने एकाचा तर शेड कोसळल्याने दुसऱ्याचा मृत्यू झाला. पावसामुळे ८ ते ९ शेड कोसळल्या असून दहा घरांचं नुकसान झालं आहे. तसंच नांदुरमध्यमेश्वर इथं वीज कोसळून एक गाय दगावली.

**पुणे, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद, नंदुरबार, जळगाव, धुळे आणि बीड** या जिल्ह्यात हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा** आणि **कोल्हापूर** जिल्ह्यात आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

<><><><><>

मुंबईत विक्रोळी इथं बांधकाम सुरु असलेल्या इमारतीचा स्लॅब कोसळून काल दोन जणांचा मृत्यू झाला. काल रात्री उशिरा झालेल्या पावसामुळे  इमारतीचा स्लॅब कोसळून त्याच्या ढिगाऱ्याखाली त्या इमारतीचे सुरक्षा रक्षक आणि त्यांचा दहा वर्षाचा मुलगा हे दोघे दबले गेले.  अग्निशमन दलाच्या जवानांनी दोघांना  तात्काळ राजावाडी रुग्णालयात दाखल केलं . पण आज सकाळी या  दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

//<><><><><>//